# प्रकरण तिसरे

## वाड.मय प्रकारानुसार अध्यापन पध्दती व मातृभाषेचा शिक्षक.


३.१ : प्रस्तावना :-

३.२ : क] वैचारिक गद्याचे अध्यापन.

ख] काव्य व अन्य ललित वाड.मयाचे अध्यापन.

ग] कथावाड.मयाचे अध्यापन.

घ] नाटकाचे अध्यापन.

त] व्याकरणाचे अध्यापन.

थ] भाषण विकासासाठी अध्यापन.

द] लेखन विकासासाठी अध्यापन.

ध] सृजनशीलतेच्या विकासासाठी अध्यापन.

प] अभ्यासनुवर्ती उपक्रम.

३.३ : मातृभाषेचा शिक्षक.

३.४ : समारोप.

संदर्भ.

# प्रकरण ३ रे

## वाड.मय प्रकारानुसार अध्यापनपध्दती व मातृभाषेचा शिक्षक

३.१ : प्रस्तावना:-

मागील प्रकरणामध्ये मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्त्व स्पष्ट केले. या प्रकरणामध्ये वाड.मय प्रकारानुसार अध्यापनपध्दती व मातृभाषेचा शिक्षक याबद्दल माहिती दिली आहे.

ज्ञान व आकलन, प्रगटीकरण आणि रसग्रहण या तीन उद्दिष्टांच्या आधारे मराठीचे अध्यापन करावे. शिवाय सृजनशीलता याही उद्दिष्टाचा विचार करावयास पाहिजे. अध्यापनाचा विचार या उद्दिष्टांच्या दृष्टिकोणातून करावा लागतो. साहजिकच अभ्यासक्रमातील घटकांचेही वर्गीकरण उद्दिष्टपरत्वेच करणे आवश्यक ठरेल. म्हणून साहित्याचे वर्गीकरण गद्य व पद्य अशा ढोबळ स्वरूपात न करता वैचारिक गद्य-ज्यात विचार-प्रवण निबंध व लेख येतील व काव्य आणि ललित वाड.मय -ज्यात कथा, कादंबरी, नाट्यप्रवेश, नाट्यछटा इत्यादी प्रकारयेतील - अशाप्रकारे करणे अधिक सोयीस्कर होईल.

३.२ : क] वैचारिक गद्याचे अध्यापन:-

विद्यार्थ्यांच्या भाषाग्रहणशक्तींचा, आकलनशक्तीचा, विचारशक्तीचा व कल्पनाशक्तीचा वैचारिक पाठाव्दारे विकास घडवून आणणे हे अंतीम उद्दिष्ट आहे.

अध्यापनक्रियेत प्रस्तावनेची आवश्यकता असते. प्रस्तावना करण्याचे विविध प्रकार आहेत. पूर्वज्ञान जागृत करून नवीन ज्ञानाबाबतची उत्सुकता वाढविण्याची शक्ती प्रस्तावनेत असते. नवीन ज्ञान ग्रहण करण्याची भावना वाढविणे हे प्रस्तावनेमुळेच साध्य होते.

हेतूकथनानंतर शिक्षकाचे प्रगट वाचन असते. शब्दांचे स्पष्ट निर्दोष व शुध्द उच्चार करावेत. विराम चिन्हांची दखल घेणे जरूरीचे असते. अर्थपूर्ण व भावपूर्ण वाचन असावे. लेखकाला जे म्हणावयाचे ते शिक्षकाच्या प्रगट

A 11703

ह वाचनातून विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे. या सर्व गोष्टींचा विचार करून केलेले वाचन म्हणजेच'आदर्श वाचन'होय.

वैचारिक गद्याच्या पाठात मूकवाचन देण्याची नितांत आवश्यकता आहे. मूकवाचनालाच मनोगत वाचन असेही म्हणतात. मनात वाचणे, समजून-उमजून वाचणे, वेगाने वाचणे, वाचताना चटचट अर्थ ध्यानात घेणे, आशयाचे नीट आकलन होणे. म्हणजेच मूकवाचनक्षमता निर्माण करणे होय. मूकवाचनामुळे वेळ व शक्ती यांची बचत होते. विद्यार्थ्यांच्या वाचनाची गती वाढते. गती वाढली म्हणजे वाचनाची व्याप्तीही वाढविता येते. मूकवाचनाची सवय लावून विद्यार्थ्यांच्या वाचनाकलन-शक्तीच्या विकासाची जबाबदारी प्रामुख्याने भाषेच्या अध्यापनावर पडते. मूकवाचन दिल्यानंतर विद्यार्थी ते कसे करतात. याकडे शिक्षकाने लक्ष दिले पाहिजे. ओठ हलवणे, पुटपुटणे, शब्दावर बोट ठेवून वाचणे इत्यादी अनिष्ट क्रियापासून त्यांना परावृत्त करावे. मूकवाचनात एकाग्रचित्त ठेवणे आवश्यकआहे.

मध्यवर्ती कल्पना वा प्रमुख मुद्दा काढून घेतल्यावर पोट प्रश्नांच्या साहयाने इतर कल्पना, विचार वा मुद्दयाचे विवेचन करून घेण्यासाठी ही पध्दती उपयुक्त ठरते. प्रतिपाद्य मुद्दयाप्रीत्यर्थ लेखकाने कोणकोणत्या विधानांचा, कल्पनांचा, उदाहरणांचा वापर केला आहे. इत्यादी सर्व माहिती विद्यार्थ्यांच्या साहयाने काढून घ्यावी. विषय कठीण वा गुंतागुंतीचा असेल तर प्रश्नांची संख्या वाढवावी. अशातऱ्हेने प्रश्नोत्तर पध्दतीचा अवलंब करताना स्पष्टीकरणार्थ शिक्षकाने जटिल कल्पना, कठीण शब्द याचे कथन करावे.

व्याख्यान पध्दतीचा वापर शिक्षकाने तारतम्याने करावा. व्याख्यानाचे तंत्र लक्षात घ्यावे. व्याख्यान देणे हे एक कौशल्य आहे. एकेका मुद्दयाचे सावकाश स्पष्टीकरण करीत व विद्यार्थ्यांना ते नीट समजले की नाही याचाअंदाज घेत व्याख्यान द्यावे. व्याख्यानाची भाषा चांगली असावी. वर्ग म्हणजे व्यासपीठ नव्हे व व्याख्यानबाजी म्हणजे अध्यापन नव्हे. हे शिक्षकाने लक्षात घ्यावे.

विद्यार्थ्यांच्या शब्दसंपदेत भर घालण्यासाठी शब्दार्थ समजण्यासाठी शब्द - स्पष्टीकरण पध्दतीचा अवलंब करणे हिताचे असते. समानार्थी शब्द देणे, विरूध्दार्थी शब्द देणे, शब्दांच्या मागील पौराणिक, ऐतिहासीक संदर्भ कथनकरून शब्दाचे स्पष्टीकरण करणे, वर्तमानकालीन सामाजिक संदर्भ सांगणे, वाक्यात उपयोग करून दाखविणे, शब्दाचे वाच्यार्थ लक्ष्यार्थ व ध्वन्यार्थ स्पष्ट करणे, शब्दांच्या मागील

विशिष्ट सांस्कृतीक वातावरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करणे, शब्दाशब्दामधील सूक्ष्म भेद स्पष्ट करणे, शब्दांच्या व शब्दांच्या वेगवेगळ्या छटा असतात ते समजाविणे, शब्दांना जो विशिष्ट अर्थ प्राप्त होतो तो निर्देशित करणे या बाबतीत पी. गरे आपल्या -

' Teaching the mother tongue in the Secondary Schools' या पुस्तकात म्हणतात.

**"- - - - - for the context will not only reveal the meaning of the word in natural setting, but will often e give fine exactness and vividness to it, and they throwing the meaning into sharp relief the context shows how the word is used." 1**

म्हणून संदर्भाला जोडूनच स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. काही वेळा लेखक विशिष्ट अर्थाने शब्दांचा उपयोग करतात. त्याचे अर्थ स्पष्ट करणे, विद्यार्थ्याला शब्दकोश व्युत्पत्तीकोश, संदर्भकोश, चरित्रकोश, संस्कृतिकोश इत्यादी कसे पहावेत याची सवय लावली पाहिजे.

घटकाचे विवेचन केल्यावर त्यातील कल्पना, विचार, लेखकाचा दृष्टिकोण इत्यादी सर्व गोष्टी सारांश-रुपाने किंवा संकलीत स्वरुपात पुन्हा विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविणे आवश्यक असते. या प्रक्रियेलाच संकलन म्हणतात. याच प्रक्रियेत लेखकाची लेखनशैली, त्याच्या लिखाणातील कलात्मक सौंदर्याची वैशिष्टये याचीही चर्चा शिक्षकाने करावी. काही शब्दार्थ, वाक्प्रचार, म्हणी किंवा इतर संदर्भ याचीही चर्चा संकलनात करावी.

उपयोजन म्हणजे उपयोग करणे, मिळालेल्या ज्ञानाचा इतर गोष्टीमध्ये विद्यार्थी किती प्रमाणात उपयोग करु शकतात हे पाहण्याची प्रक्रिया म्हणजे उपयोजनच होय. व्याकरण, शब्द, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी भाषा घटकात शिवाय प्रकटीकरणात्मक व सृजनात्मक प्रक्रियेत उपयोजन उपयोगी पडते.

प्राप्त केलेल्या ज्ञानाची संकलनाप्रमाणे केवळ पुनरावृत्ती न करता त्या मुद्दयांचा, विचार - कल्पनांचा वेगळ्या व्यापक व तुलनात्मक दृष्टीकोणातून विचार अधिक अर्थपूर्ण व व्यापक अधिष्ठान प्राप्त करुन देणे हे समालोचनाचे कार्य होय. प्रत्येक

धडा अगर कविता पूर्ण शिकवून झाल्यावर अशा प्रकारचा एक समालोचनात्मक पाठ घेता येईल. जो पाठयांश शिकविला त्यातील आशयाच्या संदर्भात काही वादग्रस्त मुद्देद उपस्थित होत असतील तर त्यांची चर्चा करणे, प्रतिपाद्य विषयाच्या दृष्टिकोणाचा वेगळ्या बाजूने विचार करायला लावणे, तत्संबंधीत विषयावर काही निबंध , कथा, कविता पूर्वी अभ्यासिल्यास त्यांचा व प्रस्तुत पाठयांशाचा, त्यातील विचारांचा, लेखकाच्या दृष्टिकोणाचा, लेखनशैलीचा तुलनात्मक अभ्यास करवून घेणे, त्याच विषयावर लिहिल्या गेलेल्या इतर लेखांचा त्याच वा इतर लेखकांच्या व त्यातील विचारांचा स्थूल परिचय करुन देणे, निदान त्यांचे वाचनकरावयला लावणे, एकाच लेखकाच्या वा कवीच्या शिकवलेल्या दोन कलाकृतीत कांही लक्षणीय फरक असल्यास तोही विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे. असे अनेक अभ्यासविषय या संदर्भात सूचवता येतील.

ब] <u>काव्य व अन्य ललित वाड.मयाचे अध्यापन:-</u> साहित्यातून रसाविष्कार व सौंदर्य-दर्शन घडते त्याच प्रमाणे अप्रत्यक्षपणे नीतीमूल्यांचे संस्कारही मनावर घडतात व दोहोंच्या संस्कारातून सदभिरुची निर्माण होत असते.

ए. एम. जॉर्डन या शिक्षणशास्त्रज्ञाच्या मते -

"रसग्रहणात दोन प्रक्रियांचा अंतर्भाव होतो. उत्तम साहित्य कोणते व नकली, दिखाऊ व भपकेबाज साहित्य कोणते हे ओळखता येणे व दोन श्रेष्ठ साहित्याचे विशेष कोणते हे समजणे". [२]

शिक्षणशास्त्रज्ञ स्टॉर्मझँड यांचे मते रसग्रहणात्मकअध्यापनाची खालील उद्दिष्टे असतात.

1) **To get pupils to love good books.**
2) **To value and enjoy high and noble thoughts.**
3) **To understand and sympathize with human nature.**
4) **To realise the variety and possible intensity of human life.**[3]

सदभिरुची निर्माण करणे, उदात्त जीवन-विषयी आदर निर्माण करणे, त-हेत-हेच्या मानवी स्वभावांशी व जीवनाशी समरस होणे. जीवनातील वैचित्र्याची व सखोलतेची प्रचीती आणून देणे. ही रसग्रहणात्मक उद्दिष्टे साध्य करताना पुढील अध्यापन विषयक तत्त्वे मार्गदर्शक ठरतात.

रसानुभूती वा सौंदर्यानुभूती ही केवळ विचारनिष्ठ वा बुध्दिनिष्ठ नसून ती भावनिष्ठ किंवा अनुभवानिष्ठ असते. अध्ययन अध्यापनात समजणे, जाणणे यापेक्षा भावणे, अनुभवणे, आस्वाद घेणे याला अधिक महत्व असते. म्हणून अध्यापकाने केवळ अर्थस्पष्टीकरणावर भर न देता रस व सौंदर्य यांची अनुभूती आणून द्यावी. त्यासाठी स्वत: रसास्वाद उत्कटतेने घेतला पाहिजे.ही रसानुभूती विद्यार्थ्यात संक्रमित करण्यासाठी उत्कृष्ट व भावपूर्ण वाचन, भावदर्शन, रसोत्कट स्पष्टीकरण व रसानुकूल वातावरण निर्माण केले पाहिजे. हे करतांना विद्यार्थ्यांवर रसानुभूती लादू नयें. सूचीत करावी. विद्यार्थ्यांच्या भावनांना आवाहन करणे, अध्यापनात सहभागी करुन घेणे, त्यांचे विचार, कल्पना व्यक्त करण्याची संधी देणे, स्वयंस्फूर्तीने त्यानी रसग्रहण करावे असे वातावरण शिक्षकाने निर्माण करावे. यासाठी शिक्षकांचे व्यक्तीमत्व, रसीकता, सहानुभूती, सहृदयता, भावनोत्कटता याला जास्त महत्व आहे. तसेच रसपूर्ण अभिव्यक्तीचे सामर्थ्यही त्याच्याजवळ असावे.

काव्याचे वाचन वा अध्ययन ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. काव्याच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना आनंद देण्याचा प्रयत्न शिक्षकाने करणे आवश्यक आहे.

काव्याची गोडी चाखण्यासाठी विद्यार्थ्यांचे मन तयार करावे. तसे वातावरण शिक्षकाने निर्माण करावे. कवितेतील मुख्य विषयाची ओळख, किंवा मध्यवर्ती कल्पनेवर चर्चा करणे, कवीचा परिचय करुन देणे व परिपोषक अशी पार्श्वभूमी निर्माण करणे अशा विविध प्रकारे प्रस्तावना करता येते. काही प्रसंगी विरोधी पार्श्वभूमी निर्माण करुनही रसपरिपोषक वातावरण निर्माण करता येईल. कुशल अध्यापक आपल्या कल्पकतेचा उपयोग करुन अनुरुप प्रस्तावनेचा अवलंब करु शकतो.

कवितेच्या अध्यापनाचा प्रारंभ कवीतेच्या मुखवाचनाने व्हावा. कवितेच्या अध्यापनाचे बरेच यश हे कवितेच्या वाचनावर अवलंबून आहे. शब्दांना विशेष महत्व असते. त्यातून कवीला काही विशेष आशय ध्वनित करावयाचा असतो. तो नीट समजून त्या त्या शब्दावर किंचीत आघात देऊन त्यातील अभिप्रेत आशय परिणामकारकपणे संक्रमित करावा.

आवाजातील आरोह-अवरोह, आवेश, गांभीर्य, कारुण्य, वात्सल्य, मृदुता, गतीमधील चढउतार, विशिष्ट शब्दावरील आघात इत्यादी सर्व गोष्टींचा अर्थ व भाव यांना अनुरुप अशा स्वरुपात अवलंब करुन वाचन करावे. कवितेत व्यक्त झालेल्या हर्षविषादादी भावना शिक्षकांच्या चेहऱ्यावरही प्रकट झाल्या पाहिजेत.

पहिले काव्यवाचन होत असताना विद्यार्थ्यांना पुस्तके बंद करावयास सांगावीत. नंतर विद्यार्थ्यांना पुस्तके उघडावयाला सांगून शिक्षकाने पुन्हा कवितेचे वाचन करावे.

कविता ही एक संपूर्ण व स्वयंपूर्ण कलाकृती असते. कोणत्या तरी एकाच घटनेचे वा प्रसंगाचे तीत वर्णन असते. कवितेचे हे एकजिनसी स्वरूप लक्षात घेता तिचा समग्र व पूर्ण स्वरूपातच संस्कार करणे इष्ट ठरते. प्रत्येक कडव्याचा पृथक स्वरूपात व क्रमाक्रमाने अभ्यास करणे चुकीचे आहे. प्रथम कवितेचे व संपूर्ण स्वरूपात दर्शन, तिचा संपूर्ण व एकजिनसी संस्कार व नंतर त्या एकात्मतेच्या आधारे घटकांचा विचार करावा. पूर्णाकडून अंशाकडे **(From whole to parts)** जावे.

संपूर्ण स्वरूपात कवितेचे वाचन केल्यावर विद्यार्थ्यांना मूकवाचन द्यावे. त्यानंतर कवितेतील मूळ विषय, मध्यवर्ती कल्पना, चित्रीत केलेला प्रसंग किंवा दृश्य कोणते हे सूचक प्रश्न टाकून विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावे. कवीने आपल्या मनातील विचार भावना अगर कल्पना सुंदर व परिणामकारकपणे प्रगट करण्यासाठी सुंदर शब्दांचा, कल्पनांचा, अलंकारादींचा कसा उपयोग करून घेतला आहे याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. कविता समजणे पुरेसे नाही. ती अनुभविली पाहिजे. कठीण शब्दांचा परिचय कविता शिकविण्यापूर्वीच करून दिल्यास चांगले.

प्रारंभी कवितेचे संपूर्ण दर्शन, नंतर तिच्यातील विविध सौंदर्यघटकांचे विश्लेषण व शेवटी पुन्हा संपूर्ण कवितेचा संकलित स्वरूपात संस्कार ही पध्दती रसग्रहणात्मक उद्दिष्टांच्या साध्यतेला पोषक ठरते. शेवटी कवितेतील विषयावर आधारित इतर कवींच्या काही कविता, किंवा त्यातील काही कल्पना व काव्यपंक्ती यांचाही परिचय करून देणे फायदेशीर ठरते.

श्लोक, आर्या, अभंग, अशा प्राचीन काव्याच्या अध्यापनात अर्थग्रहणात्मक पध्दतींचा वापर करावा असे काहींचे म्हणणे आहे तरी अर्थग्रहण व रसग्रहण व असा साचेबंदपणा काव्य अध्यापनात करता कामा नये. त्यासाठी कीर्तनकाराच्या "विषय-स्पष्टीकरण" पध्दतीचा शिक्षकांनी उपयोग करावा. भक्तीभावनांचा परिपोष करणे हे प्राचीन काव्याचे लक्षण ठरते.

थोडक्यांत, शिक्षकांची रसिकता, त्याची तन्मयता, त्यास आलेली अनुभूती व त्यानुसार होणाऱ्या भावनात्मक प्रतिक्रीया यावरच कवितेच्या अध्यापनाचे खरे यश अवलंबून आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ग] कथावाङ्‌मयाचे अध्यापन :- कथावाङ्‌मयामध्ये लघुकथा, दीर्घकथा, रूपककथा कादंबरी किंवा कादंबरीतील प्रकरणे इत्यादींचा समावेश होतो. अनुभूती-संक्रमण हा कथेच्या अध्यापनाचा उद्‌देश होय. कवितेप्रमाणेच कथा ही एक एकसंघ कलाकृती असते. त्यामुळे ती पूर्ण स्वरूपातच शिकविणे उत्तम. पूर्णापासून अंशाकडे हेच सूत्र येथेही लागू पडते. कथा मोठी असल्यास विद्यार्थ्यांना ती कथा घरूनच वाचून येण्यास सांगावे. नंतर वर्गात कथेतील विविध घटकांची चर्चा करावी. कथेतील प्रमुख घटना विद्यार्थ्यांना विचारावी. त्यानंतर त्या घटनेतून लेखकाला कोणता आशय व्यक्त करायचा आहे, प्रमुख पात्रे कोणती, त्यांचे स्वभावचित्रण यासंबंधी विवेचन करून घ्यावे. आशय व्यक्त करणारीप्रमुख वाक्ये, स्वभावावर प्रकाश टाकणारी वाक्ये, भावदर्शन घडविणारे प्रसंग, काही सुंदर वर्णने, कल्पना इत्यादींचे पुनर्वाचन करून अगर करवून त्यातील सौंदर्य व लेखकाच्या शैलीचे विशेष विद्यार्थ्यांच्या नजरेजस आणून द्यावेत.

कादंबरीचे एखादेच प्रकरण शिकवावयाचे असल्यास प्रथम कादंबरीच्या संपूर्ण कथानकाचा थोडक्यात परिचय करून द्यावा. नंतर त्याप्रकरणातील आशयाचे अध्यापन वरील पध्दतीनेच करावे. संपूर्ण कादंबरीच शिकवावयाची असल्यास वरील पध्दतीनेच प्रत्येक पाठात एकेक व दोन-दोन प्रकरणांची चर्चा करून, शेवटी संपूर्ण कादंबरीवर आधारित कादंबरीच्या सर्व घटकांचे विवेचन करावे.

घ] नाटकाचे अध्यापन:- नाट्य प्रवेशाच्या अध्यापनात पूर्व कथाभाग सांगणे, सामाजिक नाट्यप्रवेश अध्यापनात सद्य सामाजिक स्थितीवर आधारित प्रस्तावना करता येईल. नाट्य हे व्यक्तीविकासाचे व म्हणूनचशिक्षणाचे महत्वाचे साधन आहे. ते जीवनाशी अधिक जवळचे आहे. व्यवहारात परिणामकारकरितीने बोलावे कसे, वागावे कसे, इतराशी संबंध ठेवावे कसे, त्यांच्याशी समरस व्हावे कसे, विविध भावना कशा व्यक्त कराव्यात, तसेच संवेदनक्षमता, सहृदयता, रसिकता, इत्यादींचा विकास करून घेण्याचे शिक्षण नाट्यातून देता येते. नाट्य म्हणजे नाटकीपणा नव्हे तर परिणामकारकता, रसोत्कटता होय.

वर्गात नाट्य प्रवेशातील कथानक, पात्रे, त्यांचे स्वभाव, संघर्ष, भाषा, संवाद इत्यादी घटकांची चर्चा करवून घ्यावी. भावना, रसोत्कटता, स्वभावविशेष किंवा मौलिक विचार व्यक्त करणाऱ्या वाक्यांचे नाट्यमय वाचन व्हावे. त्यावर चर्चा व्हावी.

आवांतर वेळेत नाट्यवाचनाचे आयोजन शक्य झाल्यास प्रवेश प्रयोजित करून घ्यावेत. मात्र रंगमंच, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा यांचे अवडंबर नको. नाट्य हे दृश्यकाव्य आहे.

म्हणून नाटकाच्या अध्यापनात ग्रहणात्मक व श्राव्य प्रक्रियेप्रमाणेच वाचिक व दृश्य प्रक्रियांना चालनादेणा-या प्रयोगरूप उपक्रमांचाही अवलंब व्हावा. नाटयछटेतही नाटयपूर्ण वाचन, नाटयीकरण, प्रात्यक्षिक, पात्र स्वभावदर्शन इत्यादी प्रक्रियांचा उपयोग करून घ्यावा.

अनुकूल प्रस्तावनेच्या व्दारे नाटकाचे सूतोवाचन करावे. नाटक कसे आहे यावर आधारित प्रस्तावना करावी. नंतर प्रत्येक प्रवेश विद्यार्थ्यांना घरून वाचून यायला सांगावे. नंतर वर्गात कथानक, पात्रे, स्वभावदर्शन, संघर्ष, भाषा, संवाद इत्यादी घटकांची चर्चा करवून घ्यावी. अनुक्रम: वातावरण निर्मिती करावी. प्रत्येक प्रवेश संपूर्ण पणे शिकवून झाल्यावर वाचन घ्यावे.

त] <u>व्याकरणाचे अध्यापन:-</u> शुध्द बोलण्या किंवा लिहिण्याला व्याकरणाची गरज नसून, अमुक शुध्द वा अशुध्द कसे याच्या स्पष्टीकरणाला आहे. व्याकरणाच्या अभ्यासाने अर्थग्रहणशक्ती व रसग्रहणशक्तीचा विकास होत नसून त्यासाठी उत्तमोत्तम वाड.मय प्रकारांच्या वाचनाची गरज असते. भाषा रचना वैशिष्टयांचा, शब्दांच्या स्वरूपाचा, त्यांच्या कार्याचा व परस्पर संबंधाचा पृथक्करणात्मक पध्दतीने अभ्यास करणारे ते एक शास्त्र आहे.

भाषा आधी व नंतर व्याकरण, या नैसर्गिक क्रमानुसारच पुरेसे भाषाप्रभुत्व प्राप्त केल्यानंतरच व्याकरणाचा परिचय विद्यार्थ्यांना करून द्यावा व उत्तर माध्यमिक अवस्थेत व्याकरणाच्या अध्यापनाला महत्त्व द्यावे. अध्यापनात व्याकरणाच्या शास्त्रीय चिकित्सेपेक्षा त्याच्या कार्यात्मक बाजूवर भर दिला तर ते विद्यार्थ्यांना रूक्ष व बोजड वाटणार नाही. व्याकरणाचा भाषारचनेशी सतत संबंध जोडणे आवश्यक आहे. व्याकरणाचा खास वेगळा पाठ घेण्याचे कारण नाही. आवश्यक तेथे स्वतंत्रपणे पाठ अवश्य शिकवावा. व्याकरण हे एक उपयुक्त शास्त्र आहे व त्याचा आपल्या भाषा संवर्धनासाठी उपयोग होऊ शकतो ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी. व भाषाविकास साधावा.

व्याकरणातील कोणत्याही घटकावर स्वतंत्र पाठ घेण्यासाठी शिक्षकाने उद्गामी अवगामी पध्दतींचा अवलंब करणे श्रेयस्कर ठरते. उदाहरणे जितकी अधिक व विविध तितकी विद्यार्थ्यांच्या कल्पना निर्दोष व स्पष्ट होण्यास मदत होते. तसेच नियम अगर व्याख्या विद्यार्थ्यांकडून काढून घेणे योग्य असते. तसेच नियम स्पष्ट करण्यासाठी अनेक उदाहरणे विद्यार्थ्यांना द्यावी लागतात. मात्र शिक्षकाने परिचित अशी उदाहरणे

द्यावीत. पाठ्यपुस्तकातील उदाहरणे दिल्यास फारच उत्तम, उदाहरणांच्या निवडी मध्ये 'ज्ञाताकडून अज्ञाताकडे' जाणे श्रेयस्कर ठरते. त्यामुळे व्याकरणाचे अध्यापन रोचक व परिणामकारक होते.

4] भाषण विकासासाठी अध्यापन:- घरी आलेल्या पाहुण्याचे यथोचीत स्वागत करणे, शुध्द व स्पष्ट उच्चार उच्चारणे, न अडखळता बोलणे, विरामचिन्हांची दखल घेवून वाचन करणे म्हणजे प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे साध्य झाली असे म्हणता येईल. बोलणे, संभाषण, कथन, स्पष्टीकरण या व्यक्तीमत्व विकासाला व जीवनाच्या यशस्वीतेला आवश्यक अशा क्षमता आहेत. या क्षमता आत्मसात करण्यासाठी त्यातील प्रमुख घटकांचा परिचय करून घेणे आवश्यक ठरते.

विद्यार्थी ज्या वातावरणात वावरतात येथील लोकांप्रमाणेच त्यांचेही शब्दोच्चार असतात. अशा विद्यार्थ्यांचे उच्चार शिक्षकाने शुध्द करावयास हवेत. शिक्षकाचेही उच्चार शुध्द असणे हे महत्त्वाचे. उच्चारशुध्दीसाठी आकाशवाणी, भाषिक ध्वनी मंजूषा[ **Lingua phones** ] पुनर्मुद्रांकन शब्दपट्टी, शब्दफीत इत्यादी साधनांचा सतत वापर करावा. ओष्ठ्य, दंत्य, तालव्य, कंठ्य इत्यादी उच्चार प्रकारांचा शास्त्रशुध्द अभ्यास करवून घ्यावा. जोडाक्षरे, संधी, सामासिक शब्द यांचे वर्गात योग्य उच्चार करावेत. काही इंद्रीयदोष उच्चारांच्या अभ्यासानेही दूर करता येतात. संस्कृत पाठांतराने शुध्द उच्चार उच्चारता येतात. त्यासाठी रामरक्षा, शिवकवच, अथर्वशीर्ष, गीता इत्यादी संस्कृत स्तोत्रांचे नित्य पठन करून घ्यावे. शिवाय चालीवर लघुगुरु मात्रांचा अवलंब करून वाचन करवून घ्यावे. विद्यार्थी कोठे व कसा चुकतो याकडे शिक्षकाचे सतत लक्ष असावे.

मुखवाचन करताना शब्दांशब्दांमधील परस्परसंबंध लक्षात घ्यावेत. विराम चिन्हांची योग्य दखल घ्यावी. शुध्द उच्चार करावेत. दुसऱ्याला स्पष्ट कळेल अशा-रितीने वाचन करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले पाहिजे. मुखवाचनाचे स्वतंत्र तास ठेवावयास हवेत. शिक्षकाचे वाचन आदर्श असावे.

सुंदर व्यवस्थित व मुद्देसूद बोलणे आवश्यक असते. आपणाला जे समजत नाही ते शिक्षकाना, विद्यार्थ्यांनी विचारण्याची सवय लावावी. शिक्षकाने अधूनमधून प्रश्न विचारावेत. त्यांची उत्तरे शुध्द, सुंदर मुद्देसूद येतात की नाही याची शिक्षकानी काळजी घ्यावी.

पाठ्यपुस्तकातील विषयावर विविध प्रकारच्या चर्चा घडवून आणाव्यात. विद्यार्थ्यांना आपले मुद्दे विचार व मते मांडण्याची संधी द्यावी. लाजाळू विद्यार्थ्यांनाही चर्चेत भाग घेण्याची सवय लावावी. स्वावलंबी वृत्तीचा व स्वयं-शिक्षणाचा विकास घडवून आणण्यासाठी चर्चापध्दती उपयुक्त ठरते.

प्रकटीकरण उद्दीष्ट साध्य होण्यासाठी कथा सांगण्याची विद्यार्थ्यांना संधी द्यावी. त्यातून त्यांना आत्माविष्काराचे समाधान मिळत असते. कथा रंगवून सांगणे हे एक कौशल्य आहे. आवाजातील चढउतार, रसाविष्कार, अभिनय, नाट्यीकरण व वातावरणनिर्मिती अशा अनेक गुणांची त्यासाठी आवश्यकता असते. शिक्षकातही हे कौशल्य असावे. वयोमानानुसार कथेची निवड करावी. निरनिराळे घडलेले प्रसंग, पाहिलेली प्रेक्षणीय स्थळे यांचे वर्णन करण्यांची संधी विद्यार्थ्यांना द्यावी. कथाकथनाचे वेळी खेळीमेळीचे वातावरण असावे.

वक्तृत्व विकासासाठी वादविवाद, परिसंवाद, छोटी मोठी भाषणे, समयस्फूर्त भाषणे विद्यालयात ठेवावीत. प्रथम वर्गातळीवर भाषण करावयास लावावे. नंतर पुढे मोठया कार्यक्रमामध्ये बोलण्याची संधी द्यावी. योग्य मुलांची चांगली तयारी करुन घेउन मोठया कार्यक्रमात भाग घ्यावयास लावावे. सुव्यवस्थीत मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाचा पध्दतशीर विकास होऊ शकेल.

द] <u>लेखन विकासासाठी अध्यापन:-</u> लेखन प्रक्रियेतील उपप्रक्रियांचा योग्य दिशेने विकास कसा करावा याचा क्रमाने विचार केला आहे.

हस्ताक्षर सुवाच्च, सुंदर, रेखीव व वळणदार काढणे हे प्रयत्नाने साध्य होते. यासाठी शिक्षकानी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन द्यावयास हवे. मराठी लेखनासाठी दुरेघी वही वापरावी. त्यामुळे अक्षर सुधारते. चुकीची अक्षरे घोटून घ्यावीत. वर्गात शाळेत हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केल्याने अक्षर सुधारण्याची स्फूर्ती येते.

-हस्व, दीर्घ व जोडाक्षरे यातील शुध्दतेबाबत शिक्षकाने फार काटेकोरपणे लक्ष द्यावे. शुध्दलेखनाबाबतचे नवीन नियम शिक्षकाने ध्यानात घ्यावेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना शुध्दलेखन लिहावयास सांगावे. "ष", "श" चा वापर "ण", "न" चा वापर योग्य तऱ्हेने करावा.

वेगाने लिहीण्याची पात्रता वाढविण्यासाठी कान व हात यांचा सहयोग प्रस्थापित करण्यासाठी श्रुतलेखन उपयुक्त ठरेल. त्याचप्रमाणे -हस्वदीर्घ, जोडाक्षरे, अनुस्वार, शुध्दलेखनाच्या इतर चुका इत्यादी लेखन दोषांचे प्रमाण कमी करता येईल.

श्रवणेंद्रिय व लेखनेंद्रिय यांत सहयोग प्रस्थापित झाल्यास अधिकाधिक शब्दसमूहाचे उच्चारण सलगपणे केले तरी विद्यार्थी लेखन कौशल्य निर्माण करू शकतात.

कर्ता, कर्म, क्रियापद यांचे परस्परसंबंध लक्षात घेवून वाक्यरचना करावी. वाक्य हाच विचाराच्या अभिव्यक्तीचा अर्थपूर्ण घटक विविध प्रयोगात्मक वाक्यरचना, शुध्द, संमिश्र, संयुक्त वाक्यप्रचार, विशेषणे, क्रियाविशेषणे, शब्दयोगी अव्यये यांचा योग्य स्थानी योग्य वापर, विधानार्थी, आज्ञार्थी, प्रश्नार्थी, इच्छार्थी वाक्यांची रचना वगैरे वाक्यरचनांचा अभ्यास विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावा. शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा वेगवेगळ्या संदर्भात उपयोग करुन घेतल्याने विद्यार्थ्यांचे उपयोजन सामर्थ्य वाढते.

लेखनविकासासाठी शिक्षकांनी विविध लेखन प्रकारांचा अवलंब करावयास हवा. वर्णनात्मक लेखन, वैचारिक लेखन, परिच्छेदलेखन, कल्पनाविस्तार, निबंधलेखन, पाठ्य-पुस्तकाधारित लेखन, व्यावहारिक लेखन इत्यादी लेखन प्रकारांचा शिक्षकांनी अवलंब केल्यास लेखनविकास घडून येतो.

लेखनातील चुका विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्या चुकांची दुरुस्ती करवून घ्यावी. याशिवाय विद्यार्थ्यांच्या लेखनक्षमतेचा विकास होणार नाही. विद्यार्थ्यांचे लेखन तपासले जात असेल तरच विद्यार्थी काळजीपूर्वक लेखन करतात.

ध] <u>सृजनशीलतेच्या विकासासाठी अध्यापन:-</u> सृजनशीलता म्हणजे नवनिर्मिती, सृजनशीलता ही उपजत प्रवृत्ती आहे. सृजनशील शक्तीच्या विकासाला अध्यापनकार्यात महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

भाषिक सृजनशीलतेचे स्वरुप कसे आहे याचाविचार प्रथम आवश्यक आहे. सृजनशील लेखन म्हणजे प्रतिभाजन्य लेखन किंवा वाङ्मयनिर्मिती असेच नव्हे तर सुंदर आकर्षक, परिणामकारक, कल्पकता, मौलिकता, वैचारिक प्रगल्भता, भावनोत्कटता इत्यादी कलात्मक अंगांचा मर्यादित प्रमाणात आविष्कार करणारे लेखन म्हणजे सृजनशील लेखन विद्यार्थ्यांचा सृजनात्मक विकास हे अध्यापनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. प्रगटीकरणाच्या पुढची पातळी म्हणजेच सृजनशीलता.

सुंदर भाषा लिहावयाला शिकविणे हे सृजनशीलतेच्या विकासाचे पहिले अंग होय. यथोचित, समर्पक व सुंदर शब्दांची योजना, अनुरुप वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग अलंकाराची योजना व संदर्भानुसार योग्य सुभाषितांचा व वचनांचा वापर हे भाषेच्या सौंदर्यप्रसाधनाचे प्रमुख घटक आहेत.

वाक्यरचनेबाबत तोचतोचपणा लेखनात असल्यास ते लेखन कंटाळवाणे वाटते. त्यासाठी

आलटून पालटून विधानात्मक, प्रश्नात्मक, उद्गारवाचक, होकारात्मक इत्यादी प्रकारांचा उपयोग केल्यास विविधता निर्माण होऊन भाषा आकर्षक वाटते. सुटसुटीतपणा, आटोपशीरपणा ही देखील सुंदर भाषेची आवश्यक लक्षणे आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतंत्र शैलीचे लेखन करावे. त्यासाठी निरनिराळ्या लेखकांचे उत्तम शैलीत लिहिलेले निवडक उतारे विद्यार्थ्यांना वाचून दाखवावे. त्यावर चर्चा करावी.

नवनिर्मितीवर स्वाध्याय द्यावेत. श्री गुड यांच्या '**Dictionary of Education**' या ग्रंथामध्ये स्वाध्यायाची पुढील प्रमाणे व्याख्या दिलेली आहे.

> "व्यक्तीशः विद्यार्थ्याला अथवा सामूहिकदृष्टया वर्गाला नेमून दिलेले बौध्दिक अथवा शारिरिक काम म्हणजे स्वाध्याय".[3]

स्वाध्यायाची रुढ चाकोरी सोडूनच परीक्षोपयोगी परिघातून बाहेर पडून नवनवीन स्वरुपाचे स्वाध्याय विद्यार्थ्यांना दिले जावेत.

हस्तलिखितासाठी विद्यार्थ्यांकडून लेख मागून घ्यावेत. हे लेख कोठे मिळतील, कसे असावेत, भाषा कशी असावी. याबाबत शिक्षकाने मार्गदर्शन करावे. मासिक हस्तलिखितातील निवडक लेख वार्षिक हस्तलिखितात घ्यावेत.

क्रमिक अभ्यासाला पोषक होतील अशा स्वरुपातच विशेषांकाचे संयोजन करावे. लेखक परिचयांक, हरिनारायण आपटे विशेषांक, संत साहित्य विशेषांक, असे विशेषांक असावेत.

उत्कट वक्तृत्व, रसाळ कथाकथन, भावपूर्ण काव्यवाचन, रसोत्कट नाटयवाचन हे सर्व सृजनात्मक अभिव्यक्तीचेच प्रकार होत. काही विद्यार्थी उत्तम बोलू शकत नाहीत, लिहू शकत नाहीत. परंतु आपल्या भावना अभिनयातून व्यक्त करु शकतात. अशा विद्यार्थ्यांकडून नाटयछटा, नाटयप्रवेश व काही कविता यांची प्रात्यक्षिके करवून घ्यावीत

प] <u>अभ्यासानुवर्ती उपक्रम:-</u> काव्य-वाचन, काव्यगायन, काव्यदर्शन, प्रत्यक्ष कवीचे काव्यगायन, आकाशवाणी काव्यगायन इत्यादी कार्यक्रम ठेवल्यास विद्यार्थ्यांच्या रसानुभूतीच्या विकासाला हातभार लावता येईल. कथा-कथन, नाट्य वाचन स्पर्धा, कविसंमेलन, काव्यपाठांतर, गायनस्पर्धा, उत्तम काव्यपंक्तीसंग्रह स्पर्धा आयोजित कराव्यात. आकाशवाणी कार्यक्रमावरील गुण-दोष याबाबतही चर्चा घडवून आणावी.

३.३ : मातृभाषेचा शिक्षक:- शिक्षकाला लेखकाच्या कलाकृतीचा भाष्यकार व्हावे लागते. त्यातील सौंदर्याचे दर्शन घडवावे लागते. नाट्यीकरणाच्या द्वारा रसाविष्कार करावा लागतो. लेखकाच्याकलेशी सुसंवाद साधावा लागतो. कवितेशी एकरूप व्हावे लागते. मातृभाषेचा शिक्षक हा श्रेष्ठ कलावंत असावा लागतो. म्हणूनच म.बा. कुंडले म्हणतात,

> "कलावंताने निर्माण केलेल्या कलाकृतीचा
> आस्वाद विद्यार्थ्यांना घ्यावयाला लावणारा
> शिक्षक हा ही एक प्रति कलावंतच असला पाहिजे".[४]

शिक्षकात अभ्यासूवृत्ती , व्यासंग, आपल्या विषयावर प्रभुत्व, विषयाचे अद्ययावत ज्ञान, उत्तम प्रतिपादन शैली, अध्यापन कलेत नैपुण्य, प्रशिक्षण विविध नवनवीन पध्दतीशी परिचय, प्रयोगशीलता, प्रसन्न व प्रभावी व्यक्तीमत्व, विद्यार्थ्याविषयी प्रेम व जिव्हाळा शिक्षक व्यवसायावर निष्ठा हे गुण असावेत. मातृभाषेच्या शिक्षकाच्याअंगी कोणते गुण असावेत याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

१] शुध्दवाणी :- बहुजन समाजातून शिक्षक वर्गाचे आगमन होतआहे. बोलीभाषेला साहित्यातूनही प्राध्यान्य मिळत आहे. लोकभाषांचा वापरगृहीत धरूनही अध्ययन - अध्यापनासाठी प्रमाण भाषा वापरणे इष्ट. त्यामुळे शिक्षकाने शुध्द बोलले पाहिजे. विद्यार्थ्यांना शुध्द बोलावयास लावले पाहिजे. शुध्दतेचे संस्कार विद्यार्थ्यांवर करण्याची जबाबदारी मातृभाषा शिक्षकाची आहे.

२] शुध्दलेखन:- -ह्रस्व-दीर्घाचे भान, त्याचा अर्थावर होणारा परिणाम, याची दक्षता शिक्षकाने घ्यावी. फलकलेखन शुध्द व सुवाच्य करावे. शुध्दलेखनाचे नवीन नवीन ज्ञान आत्मसात असले पाहिजे.

३] भाषा प्रभुत्व:- मातृभाषा शिक्षकाला भाषेच्या साहयानेच आपला विषय रंगवावा लागतो. फुलवावा लागतो. विषय प्रतिपादनावर भाषा सौंदर्याचा साज चढवावा लागतो. लेखकाचे मत वेगवेगळ्या वाक्यांनी नटवून पटवून द्यावे लागते. वेगवेगळी शैली वापरावी लागते. म्हणून मातृभाषेचा शिक्षक भाषाप्रभू असावा. वाक्प्रचार म्हणी, अलंकार, वचने, सुभाषिते यांचा वाक्यात योग्य वापर करणारा असावा.

४] वाड.मयाचा व्यासंग:- मातृभाषा शिक्षकाला या विशाल साहित्य सागराची जाण असावयास पाहिजे. त्या त्या कालखंडातील सांस्कृतीक पार्श्वभूमी, परंपरा, रूढी याचे ज्ञान शिक्षकास असावे. निरनिराळ्या कवींच्या काव्याचे प्रयोजन माहित असावे. शब्दकोश, संस्कृतिकोश, चरित्रकोश माहित असावे. शब्दकोश, संस्कृतिकोश, चरित्रकोश वाड.मयाचा इतिहास, विविध लेख, समीक्षण या सर्व गोष्टी शिक्षकास माहित असाव्यात.

५] रसिकता व सहृदयता:- साहित्यातंर्गत सौंदर्य विद्यार्थ्यांच्या अंत:करणाला भिडवायचे असेल तर स्वत: शिक्षक रसिक, सहृदय असणे जरूरीचे आहे. नव्या शिक्षण-पध्दतीत भाषेच्या अध्यापनात रसग्रहणात्मक उद्दिष्टांचे महत्त्व मान्य झाले असून त्या उद्दिष्टांची साध्यता, अभ्यासक्रम व पध्दती यावर अवलंबून नसून ती शिक्षकांच्या व्यक्तीमत्वाशी निगडीत असल्यामुळे जोवर मराठीचे शिक्षक आपल्या अंगी रसिकता व सहृदयता बाणवत नाहीत तोवर ही उद्दिष्टे साध्य होणार नाहीत.

६] ज्ञानाचा अद्ययावतपणा:- शिक्षक वाड.मयीन बदलाशी अपरिचीत राहिल्यास नवनवीन साहित्य कृतींचे अध्यापन तो जुन्याच दृष्टीकोणातून करू पाहतो. त्यामुळे तो अपयशी ठरतो. कवितांमध्ये अर्थापलीकडे जाऊन त्यातील सौंदर्यानुभव घेण्याची आवश्यकता असते. लघुकथा लघुनिबंधाच्या जवळ येत आहे. संस्कृत परंपरेतील अलंकारीक भाषाशैलीच्या जागी आज औद्योगिक व वैज्ञानिक युगाला अनुरूप अशी नवी प्रतीमासृष्टी उदयास येत आहे. म्हणून भाषा शिक्षकाला मराठी साहित्यांतर्गत अद्ययावत विचार प्रवाहांचा व कलामूल्यांचा परिचय असला पाहिजे.

७] सृजनशीलता:- शिक्षकामध्ये शब्द प्रभुत्व, भाषाप्रभुत्व कल्पकता, सुंदर, आकर्षक व शैलीदार लेखन करण्याची क्षमता, नवनिर्मितीच्या प्रयत्नात यथोचित मार्गदर्शन करण्याची पात्रता अशा स्वरूपाची किमान सृजनता अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग करावा. सुंदर व्यवस्थित, शैलीदार लेखन करावे, कलात्मक अभिरूचीची धडपड करावी. त्यांसाठी विद्यार्थ्यांच्या निर्माण प्रवृत्तीला व कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याइतपत मार्गदर्शन करण्याइतपत कल्पकता, योजकता व कलात्मकता त्यांच्या अंगी असावी. याबाबतीत बॅटल व शेनॉन यांच्या 'द न्यू आयडिया इन एज्युकेशन' या पुस्तकातील मत विचार करण्यासारखे आहे. ते

असे -

" विद्यार्थ्यांच्या स्मरणाची पोतडी विविध वस्तूंची नावे व आकारमान यांच्या वर्णनाने भरून टाकणाऱ्या शिक्षकापेक्षा विद्यार्थ्याला एखाद्या सत्कृतीसाठी अथवा एखाद्या कवितेसाठी प्रेरित करणारा शिक्षक कितीतरी श्रेष्ठ." [५]

यातूनही विद्यार्थ्यांना नवनिर्मितीसाठी शिक्षकांनी प्रेरित करावे असेच म्हटलेले आहे.

८] संस्कृत व इंग्रजी भाषांशी परिचय:- मराठी ही संस्कृतोद्भव भाषा आहे. तत्सम शब्दांचे अर्थ आणि तद्भव शब्दांची व्युत्पत्ती समजण्यासाठी, पंडितीकाव्य शिकवितांना, संधी, समास, अलंकार, वृत्ते यांचे अध्यापन करतांना संस्कृतचा उपयोग होतो. पौराणिक संदर्भासाठी ही संस्कृत भाषा शिक्षकास लाभदायक ठरते.

तसेच आधुनिक मराठी साहित्यातील प्रवाह, प्रवृत्ती, विविध वाङ्मयप्रकार हे इंग्रजी भाषेतून आयात झालेले आहेत. आपल्या अध्यापनाचा दर्जा व अध्यापन कार्यक्षमता या भाषांच्या व्यासंगावर अवलंबून असतात. हे लक्षात घ्यावे.

९] नाट्यीकरण:- नाट्यीकरण म्हणजे साभिनय, रसोत्कट, परिणामकारक, आकर्षक, प्रभावी अभिव्यक्ती। वाचनात आरोह- अवरोह, आवाजातील चढउतार, अचूक शब्दसंधान, भावनोत्कटता, विविध रसांची अभिव्यक्ती, अनुक्रम, मुद्राभिनय, हातवारे याबरोबरच काव्यकथेतील, नाट्य प्रसंगातील वातावरण निर्माण करणे, स्पष्टीकरणातून भावनांना आवाहन करणे, शब्दचित्र उभे करणे, या गोष्टी नाट्यीकरणातून अभिव्यक्त होतात. यासाठी शिक्षकाचे अंगी नाट्यीकरण कौशल्य असावे.

१०] वक्तृत्व:- विद्यालयाच्या कोणत्याही संदर्भात किंवा इतर कार्यक्रमात वक्तृत्वाची जबाबदारी पत्करावी लागते. प्रसंगानुरूप बोलावे लागते. त्यासाठी निर्दोष व परिणामकारक वाक्यरचना, रोचक शैली, मुद्देसूद विषय मांडणी हे गुण भाषा शिक्षकाचे अंगी असणे आवश्यक आहे.

३.४ : समारोप:- प्रकरण दोन व तीन मध्ये संशोधनासाठी योग्य पार्श्वभूमी प्राप्त व्हावी म्हणून मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्व, वाङ्मय प्रकारानुसार अध्यापनपध्दती व मराठी अध्यापकाविषयी माहिती दिली आहे. पुढील प्रकरण चार मध्ये संशोधकाने विविध साधनाव्दारे मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन केले आहे.

## संदर्भ


१] म.बा. कुंडले :- पी. गरे यांचे मत

उद्घृत.

<u>मराठीचे अध्यापन</u>

पुणे, श्री विद्या प्रकाशन १९८५.

पृष्ठ क्रमांक १५१.

२] म. बा. कुंडले :- ए.एम्. जॉर्डन यांचे मत

उद्घृत.

तत्रैव.

पृष्ठ क्रमांक १५७.

३] लीला पाटील :- गुड यांची स्वाध्यायाची व्याख्या.

उद्घृत.

<u>आजचे अध्यापन.</u>

पुणे, श्री विद्या प्रकाशन, १९८३.

पृष्ठ क्रमांक ८३.

४] म.बा. कुंडले :- उपरिनिर्दिष्ट

पृष्ठ क्रमांक ९१.

५] लीला पाटील :- बॅटन व शेनान यांचे मत

उद्घृत.

उपरिनिर्दिष्ट.

पृष्ठ क्रमांक १७५.